जालना दिनांक २३ फेब्रुवारी २०२० रविवार वर्ष ३६ वे अंक १८४ किंमत १ रुपये पान-४

रामविचार

# न्या. रंजीत मोरे यांना महाराष्ट्राबाहेर पाठविल्याच्या निर्णयामुळे जनता व वकील संघटनांमध्ये आनंदोत्सव

## सरन्यायाधीश शरद बोबडे यांना पाठविले आभारपत्र, इंडियन बार असोसिएशनने केली होती तक्रार

**मुंबई ,२२ फेब्रुवारी**

मुंबई उच्च न्यायालयाचे वादग्रस्त न्यायाधीश रंजीत मोरे यांच्यावर फौजदारी कारवाई करण्यासाठी इंडियन बार असोसिएशनतर्फे पुराव्यांसहीत दिलेल्या तक्रारीनंतर झालेल्या घडामोडीत सरन्यायाधीश शरद बोबडे यांनी न्या. रंजीत मोरे यांची महाराष्ट्राबाहेर मेघालय न्यायालयात बदली केल्याच्या निर्णयाचे सामान्य जनता व विविध वकील संघटनेने आभार मानले आहे.

त्याशिवाय इंडियन बार असोसिएशन तर्फे तक्रार देण्यात आल्यानंतर न्या. झेड. ए . हक. यांची नागपूरहून औरंगाबादला तर न्या. डी. .एस. नायडू यांची मुंबई येथून गोवा येथे केलेल्या बदलीच्या निर्णयाबद्दलही इंडियन बार असोसिएशनने 'सुप्रिम कोर्ट कॉलेजियम' आणि मुंबई उच्च न्यायालयाचे चीफ जस्टीस यांचे आभार मानले आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की न्या. रंजीत मोरे हे मुंबई उच्च न्यायालयात काम करतांना





सामान्य नागरिकांच्या प्रकरणात सुनावणीच घेत नाहीत आणि सुनावणी घेतली तरी कायद्याबाहेर जाऊन श्रीमंतांच्या व विशिष्ट वकिलांच्या बाजूने निर्णय देतात व गरीब, सामान्य जनता आणि बहुतांश सर्वसाधारण वकिल यांच्यावर अन्याय करीत असून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय संविधानामध्ये दिलेल्या कलम १४ नुसार 'कायद्यापुढे सर्व समान कायद्याची अंमलबजावणी सर्वांसाठी समान ' या तत्वाचे उघड उल्लंघन न्या. रंजीत मोरे करीत असल्याने तसेच सर्वोच्च न्यायालयाने ठरवून दिलेल्या कायद्याच्या विरुद्ध जावून बेकायदेशीर आदेश पारीत करीत असल्यामुळे त्यांच्याविरुद्ध भादवि २१८,२१९ आदी कालमाअंतर्गत आणि न्या. कर्णन (२०१७) ७ SCC १ नुसार कोर्ट अवमानना कायद्याअंतर्गत कारवाई करण्यात यावी अशी तक्रार इंडियन बार असोसिएशन तर्फे राष्ट्रपती व सरन्यायाधीश यांच्याकडे केली होती. तसेच गरीब, सामान्य जनता यांना सुद्धा सलमान खान प्रमाणे जलद न्याय मिळावा व हा भेदभाव दूर करण्याकरीता योग्य ती प्रक्रीया त्वरीत राबविण्यात यावी अशी विनंती करण्यात आली होती.

त्यानंतरच्या झालेल्या घडामोडीत सुप्रिम कोर्ट कॉलेजियम ने दि. १९ फेब्रुवारी २०२० रोजीच्या निर्णयानुसार न्या. रंजीत मोरे यांची बदली मेघालय उच्च न्यायालय इथे केली आहे.

याआधी मुंबईच्याच न्या. विजया कापसे तहिलरमाणी यांची भ्रष्टाचाराच्या आरोपामुळे मेघालय येथे बदली करण्यात आली होती व त्यांनी राजीनामा दिला होता त्यावेळी सी. बी. आय. ने त्याच्या विरुद्धच्या भ्रष्टाचाराची चौकशी करण्याचे आदेश तत्कालीन सरन्यायाधीश रंजन गोगोई यांनी दिले होते.

यावरु न न्या. रंजीत मोरे यांच्या मेघालय येथेच बदली केलेल्या प्रकरणाबद्दल विविध चर्चा न्यायालयीन परिसरात सुरु असून लवकरच फौजदारी कारवाई होऊ शकते अशी चर्चा आहे.

दुसऱ्या प्रकरणात नागपूर येथील न्या. झेड. ए. हक यांच्याविरुद्धसुद्धा फौजदारी कारवाई करण्याकरीता इंडियन बार असोसिएशनने तक्रार दिली होती. न्या. हक यांनी टी. बागूल प्रकरणात अनेक वकिलांना खोटी व बेकायदेशीर कोर्ट अवमाननाची नोटीस पाठविल्याचे सिद्ध झाल्याने खंडपीठाचे तत्कालीन वरिष्ठ न्यायाधीश व सध्याचे सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश (पान ३ वर)

# न्या. रंजीत मोरे यांना महाराष्ट्राबाहेर....

भूषण गवई यांनी न्या. हक यांच्याविरुद्ध कडक ताशेरे ओढून त्या वकिलांची माफी मागून ती बेकायदेशीर कोर्ट अवमाननाची नोटीस खारीज केली होती. (२०१८ SCC OnLine Bom ४८७३).

त्यानंतर पुन्हा काही दिवसांनी न्या. झेड. ए. हक यांनी अँड. निलेश ओझा याना कोर्ट अवमाननाची नोटीस दिली. त्याबाबत इंडियन बार असोसिएशनने रीतसर तक्रार दाखल करु न न्या. हक यांच्याविरुद्ध विविध पुरावे दाखल करु न न्या. हक यांच्याविरुद्ध फौजदारी व कोर्ट अवमानना अंतर्गत कारवाई ची मागणी केली होती.

न्या. हक यांची नागपूरहून औरंगाबाद येथे बदली करण्यात आली आहे. काही वकिलांनी चीफ जस्टीस प्रदीप नंदरजोग यांना ती बदली रोखण्याची विनंती केली होती. ती विनंती फेटाळून लावण्यात आली असून मी माझ्या निर्णयावर ठाम असल्याचे चीफ जस्टीस नंदरजोग यांनी सांगितले.

या संदर्भात इंडियन बार असोसिएशनचे राष्ट्रीय समन्वय समितीचे कार्यकारी अध्यक्ष अँड. ईश्वरलाल अगरवाल यांनी आभार व्यक्त करणारे पत्र पाठवून जनता व वकील संघाच्या भावना चीफ जस्टीस ऑफ इंडिया यांना कळविल्या आहेत.